# फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क
# गडचिरोली

## विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिर अहवाल
## सत्र 2021-22

### विभाग प्रमुख

**सहा.प्रा. दिपक विश्वनाथ  तायडे**
**सहा.प्रा. हितेश मुरलीधर चरडे**

**प्रति,**

**मा.संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.**

**विषय :-** फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना सन 2021-22 च्या विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिराचा अहवाल स्विकारण्याबाबत.

**संदर्भ :-** आपले पत्र क्र.GU/NSS/122/2022.

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना सन 2021-22 च्या विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिराचा सविस्तर अहवाल आपणास सादर करण्यात येत आहे. महाविद्यालयाद्वारे प्रस्तुत विषेश श्रम संस्कार व ग्रामीण शिबीराचे आयोजन दिनांक 3 एप्रिल 2022 ते 9 एप्रिल 2022 या कालावधीत मौजा दर्शनी माल या गावामध्ये करण्यात आले होते . यासाठी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करुन शिबीरासाठी गावाची निवड करण्यात आली . प्रस्तुत शिबिर हे निवासी पध्दतीने घेण्यात आले असुन यासाठी मा.शिक्षणाधीकारी (प्राथमीक), मा.गटविकास अधिकारी गडचिराली , महाविद्यालय प्रशासन, मा.सरपंच मौजा दर्शनी माल याच्या रितसर परवानगी घेउन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाला गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीद्वारे निर्गमीत आदेश व सुचनांचे पालन करुन विषेश श्रम संस्कार व ग्रामीण शिबीराचे आयोजन करण्यात आले. यासाठी शिबिर आयोजनापुर्वी शिबिराचे स्थळ निश्चीत करण्यासाठी काटली ,मसेरी,बोदली,पोर्ला,पुलखल , दर्शनीमाल आदि गावांची पाहणी करण्यात येऊन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सर्व बाजुचा पैलुंचा साधक बाधक विचार व चर्चा करुन मौजा दर्शनी माल हे गाव निश्चीत करण्यात आले. त्यासाठी गावातील प्रतीष्ठीत व्यक्ती तसेच सरपंच सौ.जयपालाताई किशोर दुधबावरे, पोलीस पाटील श्रा.धोंडुजी उडान ,तंटामुक्त समीती अध्यक्ष, प्राथमीक शाळा मुख्याध्यापक श्री.कुळमेथे सर तथा शाळा व्यवस्थापन समीती अध्यक्ष आदि मान्यवरांच्या भेटी घेउन गावामध्ये वातावरण निर्मीती तथा तांत्रीक दृष्ट्या परवानगीची प्रक्रीया पार पाडुन उपरोक्त कालावधीत विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रस्तुत विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिर अंधश्रध्दा निर्मुलन व मतदान जनजागृतीकरीता युवाशक्ती ही संकल्पना घेऊन आयोजीत करण्यात आले होते. त्यासाठी शिबिरादरम्यान उपरोक्त विषयावर विविध कार्यक्रमांचे आयोजन आणि पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले सोबतच बौध्दीक सत्रांचे सुध्दा आयोजन करण्यात आले. यामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन

आणि जादुटोना विरोधी कायद्याविषयी जनजागृती होण्यासाठी अंधश्रध्दा निर्मुलन समीती गडचिरोलीच्या चमुला आमंत्रीत करण्यात आले होते.प्रस्तुत शिबीरासाठी उद्घाटक म्हणुन जिल्हा माहीती अधीकारी श्री.सचीन अडसुळ साहेब हे उपस्थीत होते तर प्रमुख अतीथी म्हणुण सरपंच मौजा दर्शनी माल सौ.जयपालाताई किशोर दुधबावरे , पोलीस पाटील श्री.धोंडुजी उडान,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश के.खंगार , महाविद्यालयाचे पदव्युत्तर पदवी विभागप्रमुख डॉ. विवेक गोर्लावार , पदवी विभाग प्रमुख डॉ.रुपेंद्रकुमार गौर , हे उपस्थित होत तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद तथा शिक्षकेत्तर कर्मचारी आणि समस्त गावकरी मडळी उपस्थीत होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातुन विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिरादरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . यामध्ये प्रामुख्याने, नवमतदार नाव नोंदनी तथा मतदान जन जागृती साठी समुदायात पथनाटयांचे सादरीकरण, महाराष्ट्र शासन सामाजीक न्याय व विषेश सहाय्य विभागाच्या विविध योजना पथनाट्याच्या माध्यमातुन जनसामान्यांपर्यत पोहचविण्याचे कार्य , अंधश्रध्दा निर्मुलनासाठी पथनाट्याचे सारदीकरण , सामुदयिक विकासात युवकांची भुमीका, मतदान जनजागृतीसाठी रॅली , विविध महापुरुषांच्या भुमीका साकारुन रॅलीच्या माध्यमातुन त्यांचे विचार व कार्य लोकांपर्यत पोहचवने यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतीबा फुले , सावित्रीबाई फुले , राणी लक्ष्मीबाई , शाहु महाराज , भगतसिंग , बिरसा मुंडा अहील्याबाई होळकर , बहीणाबाई आदिंच्या भुमीका याप्रसंगी विद्यार्थ्यांनीसाकारल्या.

शिबीराचे उल्लेखनीय कार्य म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा देऊन अभिवादन करण्याच्या उद्देशाने दलितांना त्याचा पाण्याला स्पर्श करण्यासाठीचा हक्क मिळवुन देण्याच्या उद्देशाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चवदार तळे सत्याग्रहाची प्रतिकात्म्क स्वरुपात पुनरावृत्ती करण्यात आली यामध्ये सर्व ग्रामस्थ मंडळी सर्व शिबिरार्थी समाविष्ट होते. याप्रसंगी प्रा.दिपक तायडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची व्यक्तीरेखा साकारली शिबिरार्थी द्वारे केल्या गेलेल्या या क कार्याचे सर्व स्तरातुन कौतुक करण्यात आले. त्याचसोबत शिबिरादरम्यान ग्राम स्वच्छता , श्रमदान, विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन सुध्दा शिबिरादम्यान करण्यात आले.

संपुर्ण शिबिर कालावधीमध्ये सर्व शिबिरीर्थीना नित्यदिनक्रमाचे पालन करणे बंधनकारक होते. ज्यामध्ये सकाळी योग शिबीराला उपस्थीती , श्रमदान,विभगुन दिलेल्या समीतीचे कार्य पार पाडणे , सांस्कृतीक कार्यक्रमात सहभाग , समीती कार्याचे प्रतिदीन अहवाल लिखान व रात्रीच्या चर्चासत्र व प्रार्थना सत्रात केलेल्या कार्याचे अहवाल सादरीकरण . अशाप्रकारची दैनंदीनी तथा नियमांचे व शिस्तचे व वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचनांचे काटेकार पालनसर्व विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक होते.

या सर्व प्रक्रीयेमधे महाविद्यालयाचे प्रचार्य मा.डॉ.सुरेश के. खंगार यांचे वारंवार मार्गदर्शन लाभले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृदांचे सदैव आवश्यकतेच्या वेळी सहकार्य लाभले . विषेश

श्रम संस्कार व ग्रामीण शिबिर समन्वयक म्हणुन प्रा.प्रज्ञा वनमाली व प्रा.हीतेश चरडे यांचे सदैव सहकार्य मिळाले. सन 2021-22 महाविद्यालयाचा विषेश श्रम संस्कार व ग्रामीण शिबिराचा तपशीलवार अहवाल पुढील प्रमाणे.




श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली द्वारा संचालित
फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली द्वारा आयोजित
''राष्ट्रीय सेवा योजना विभाग''
विशेष श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिर
''अंधश्रध्दा निर्मुलन व मतदान जनजागृती करीता युवाशक्ती''

निमंत्रण पत्रिका

दिनांक ३ एप्रिल ते ९ एप्रिल २०२२
स्थळ : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मौजा दर्शनी (माल)
ता. जि. गडचिरोली

प्रति, ____________

।। प्रथम पाया मानव वर्तन, यास करावे उत्तम जतन ।
गाव करावे सर्वांगसुंदर, आदर्श चित्र विश्वासते ।।
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



महोदय,
शिबिरार्थी आणि गावकऱ्यांमध्ये परस्पर सहसंबंध निर्माण करुण गावकऱ्यांना समस्या जाणून घेणे आणि शिबिरार्थ्यांच्या सुप्तगुणांचा अविष्कार फुलविणे हि या ग्रामीण शिबिरामधील परिकल्पना, त्याची पुर्तता व्हावी म्हणून आमच्या महाविद्यालया तर्फे ''श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिराचे'' आयोजन करण्यात आलेले आहे.
तरी सदर कार्यक्रमाला उपस्थित राहून आम्हाला उपकृत करावे हि विनंती.

आपले विनित

डॉ. सुरेश के. खंगार
प्राचार्य, फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली

सौ. जयपालाताई किशोर दुधबावरे
सरपंच, मौजा-दर्शनी (माल) ता. जि. गडचिरोली


शिबिर प्रमुख

प्रा. दिपक व्ही. तायडे, प्रा. हितेश एम. चरडे, प्रा. प्रज्ञा एस. वनमाळी
तथा
समस्त प्राध्यापकवृंद, कर्मचारीवृंद आणि शिबिरार्थी

श्री कालिदास सातपुते, उपसरपंच
श्री धोंडुजी उडाण, पो.पा. (दर्शनी माल)
श्री मुर्लीधर चापले, पो. पा. (दर्शनी चक)
सौ. पोर्णिमा वैरागडे, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती
श्री सुधाकर वैरागडे, अध्यक्ष, तंटामुक्ती समिती
श्री शंकर उडाण, अध्यक्ष, सेवा सहकारी समिती
श्री. आर. वाय. कुळमेथे, मुख्याध्यापक
सौ. एम. भांडेकर, शिक्षक
श्री. डि. के. वाढणकर, ग्रामसचिव

मा. ग्रामपंचायत सदस्य : श्री विनोद आर. सातपुते, सौ. यशोदा आय. बोबाटे, सौ. शोभा जे. कोठारे, सौ. ज्योती एम. उडाण, सौ. कविता एम. उडाण
तथा समस्त
शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पाणी पुरवठा समिती सदस्य, संपूर्ण महिला बचत गट, समस्त शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सक्रीय युवक मंडळ व समस्त गावकरी मंडळी

विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिर निमंत्रण पत्रीका



रविवार दि. ३ एप्रिल २०२२

| | | | |
|---|---|---|---|
| दुपारी | २.०० वा | : | शिबिरार्थींचे आगमन व गावकऱ्यांच्या भेटी |

सोमवार, दि. ४ एप्रिल २०२२

| | | | |
|---|---|---|---|
| सकाळी | ६.०० ते ७.३० वाजता | : | योग शिबिर |
| सकाळी | ९.०० वाजता | : | ग्रामसफाई व दिंडी |
| सायंकाळी | ७.३० वाजता | : | शिबिराचे उद्घाटन |
| सायंकाळी | ८.०० ते ९.०० वाजता | : | सांस्कृतिक कार्यक्रम |


अध्यक्ष
मा. सौ. शालिनीताई रमेशचंद्रजी मुनघाटे
अध्यक्षा, श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली

उद्घाटक
मा. श्री सचिन अडसूळ
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

प्रमुख अतिथी
मा. डॉ. रूपेन्द्रकुमार गौर, पदवी विभाग प्रमुख गडचिरोली
मा. डॉ. विवेक गोर्लावार, पदव्युत्तर पदवी विभाग प्रमुख गडचिरोली
मा. श्री प्रल्हाद म्हशाखेत्री, जिल्हा प्रतिनिधी दै. पुण्यनगरी
मा. सौ. जयपालाताई किशोर दुधबावरे, सरपंच, ग्रा. पं. दर्शनी माल

मंगळवार, दि. ५ एप्रिल २०२२

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६.०० ते ७.३० वा | : | योग शिबिर |
| सकाळी ८.३० ते ११.३० वा | : | ग्रामस्वच्छता व श्रमदान |
| दुपारी ४.०० ते ६.०० वा | : | अंधश्रध्दा निर्मुलनावर प्रात्यक्षिक कार्यक्रम |
| सांयकाळी ६.०० ते ८.०० वा | : | सांस्कृतिक कार्यक्रम |



बुधवार, दि. ६ एप्रिल २०२२

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६.०० ते ७.३० वा | : | योग शिबिर |
| सकाळी ८.३० ते ११.३० वा | : | ग्रामस्वच्छता व श्रमदान |
| सकाळी १०.०० ते २.०० वा | : | आरोग्य तपासणी तथा रक्तदान शिबिर जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोलीचे पथक |
| सांयकाळी ६.०० ते ८.०० वा | : | सांस्कृतिक कार्यक्रम |

गुरुवार, दि. ७ एप्रिल २०२२

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६.०० ते ७.३० वा | : | योग शिबिर |
| सकाळी ८.३० ते ११.३० वा | : | पथनाट्य व श्रमदान |
| दुपारी २.०० ते ५.०० वा | : | सामुदायिक विकासात युवकांची भुमिका |
| प्रमुख वक्ते | : | श्री. संदिप लांजेवार गडचिरोली |
| सायं. ६.०० ते ८.०० वा | : | सांस्कृतिक कार्यक्रम |

शुक्रवार, दि. ८ एप्रिल २०२२

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६.०० ते ७.३० वा | : | योग शिबिर |
| सकाळी ८.३० ते ११.३० वा | : | ग्रामस्वच्छता व श्रमदान |
| दुपारी २.०० ते ५.०० वा | : | मतदान जनजागृती रॅली व पथनाट्य |
| सायं. ६.०० वा | : | समारोपीय कार्यक्रम |

शनिवार, दि. ९ एप्रिल २०२२

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६.०० ते ७.३० वा | : | योग शिबिर |
| सकाळी ८.३० ते ११.३० वा | : | परिसर स्वच्छता |
| दुपारी १२.०० वा | : | प्रस्थान |

विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिर निमंत्रण पत्रीका







शिबिराचे उद्घाटन करतांना मा.जिल्हा माहीती अधिकारी श्री.सचीन अडसुळ साहेब तथा सरपंच सौ.जयपाला दुधबावरे







उद्घटनिय फलकाचे अनावरण करतांना प्राचार्य मा.डॉ.सुरेश के.खंगार सर तथा मान्यवर







**उद्घाटनिय कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करतांना मा.सचिन अडसुळ तथा डॉ.सुरेश खंगार सर**

विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना समाजसेवेमध्ये पैसा महत्वाचा नसुन आत्मीक समाधान महत्वाचे आहे. पैसा महत्वाचा नसुन शरीर सपंत्ती महत्वाची आहे. पैसा नेहमी उन्हात राहीला पाहीजे व मानुस हा सावलीत राहीला पाहीजे लोक पैशासाठी शरीराकडे दुर्लक्ष करतात असे मत मा.सचिन अडसुळ यांनी विद्यार्थ्यांना संबोधीत करताना व्यक्त् केले.

श्रमसंस्कार शिबिरातुन शिबीरार्थ्यावर खऱ्या अर्थाने श्रमाचे संस्कार पडतात यामुळे देहयष्टी सुदृढ राण्यासाठी मदत होते. शिबिरार्थी आणि गावकरी यांच्या सहसंबंधातुन गावातील समस्या सोडविल्या जाऊ शकतात. तसेच अंधश्राध्दा निर्मुलन व मतदान जनजागृती करण्याकरिता युवकांनी पुढाकार घ्यावा कारण युवकच खऱ्या अर्थाने राष्ट्र विकासाचे आधारस्तंभ आहेत . त्याशिवाय राष्ट्र,समाज ,खेडे यांचा विकास होऊ शकत नाही म्हणुन श्रम,संस्कार आणि ग्रामीण या त्रीसुत्रीला नजरेसमोर ठेऊन शिबिरार्थ्यानी कार्य करावे असे आवाहन डॉ.सुरेश के.खंगार यांनी आपल्या मार्गदर्शनात शिबिरार्थ्यांना केले.



# समाजसेवेत पैसा महत्वाचा नसून आत्मिक समाधान महत्त्वाचे

देशोन्नती वृत्तसंकलन...

## * जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ यांचे प्रतिपादन

**गडचिरोली** ● समाजसेवेत पैसा महत्वाचा नसुन आत्मिक समाधान महत्वाचे आहे असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ यांनी केले.

स्थानीक फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्कच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने विशेष ग्रामीण शिबीराचे आयोजन दर्शनी माल येथे करण्यात आले होते. यावेळी ते उद्धाटक म्हणुन बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एस. के. खंगार होते. प्रमुख पाहूणे म्हणून मुख्य तपास अधिकारी सुशिल चांदेकर, प्रा. डॉ. विवेक गोर्लावार, प्रा. डॉ. रूपेन्द्रकुमार गौर, सरपंचा जयमाला दुधबावरे, तंटामुक्त गांव समितीचे अध्यक्ष सुधाकर वैरागडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पोर्णिमा वैरागडे, सेवा सहकारी समितीचे अध्यक्ष शंकर उडाण, वन व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष दिलीप भांडेकर, ग्रामपंचायत सदस्य विनोद सातपूते, ग्रामपंचायत सदस्या शोभा कोठारे, ज्योती उडाण आदी मान्यवर उपस्थित होते.

सचिन अडसूळ पुढे म्हणाले, 'आयुष्यात पैसा महत्वाचा नसून शरीर महत्वाचे आहे. पैसा नेहमी हा उन्हात राहीला पाहिजे व माणूस हा सावलीत राहीला पाहिजे. लोक पैशासाठी शरीराकडे दुर्लक्ष करतात. समाज सेवेत पैसा केंद्रस्थानी नसतो तर आत्मिक समाधान महत्वाचे असते. विद्यार्थी, पदाधिकारी तसेच शासकीय सेवकांनी समाजसेवा करत असताना मानसिक समाधान शोधले पाहिजे. त्यासाठी लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे आवश्यक आहे. ज्या दिवसी लोक चळवळ निर्माण होईल त्या दिवसी प्रत्येकाला आत्मीक सुख लाभेल असेही ते म्हणाले. अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. एस. के. खंगार यांनी, शिबीरार्थी आणि गावकरी यांच्या सहसंबंधातून गावातील समस्या सोडविल्या जावू शकतात असे सांगितले. अंधश्रध्दा निर्मूलन व मतदान जागृती करण्याकरीता यूवकांनी पुढाकार घ्यावा कारण यूवकच खऱ्या अर्थाने राष्ट्रविकासाचे आधारस्तंभ आहेत. त्याशिवाय राष्ट्र, समाज, खेडे यांचा विकास होवू शकत नाही. म्हणून श्रम, संस्कार आणि ग्रामिण या त्रिसूत्रीला नजरेसमोर ठेवून शिबीरार्थीनी कार्य करावे असे आवाहन केले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांची समायोचीत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वाय. आर. गहाणे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिपक तायडे तर उपस्थितींचे आभार प्रा. हितेश चरडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व शिबीरार्थी यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

# समाजसेवेत पैसा महत्त्वाचा नसून आत्मिक समाधान महत्त्वाचे

## जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ यांचे प्रतिपादन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**गडचिरोली** : आयुष्यात पैसा महत्त्वाचा नसून शरीर महत्त्वाचे आहे. पैसा नेहमी हा उन्हात राहिला पाहिजे व माणूस हा सावलीत राहीला पाहिजे. लोक पैशासाठी शरीराकडे दुर्लक्ष करतात. समाजसेवेत पैसा केंद्रस्थानी नसतो तर आत्मिक समाधान महत्त्वाचे असते. विद्यार्थी, पदाधिकारी तसेच शासकीय सेवकांनी समाजसेवा करत असताना मानसिक समाधान शोधले पाहिजे. त्यासाठी लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे आवश्यक आहे. ज्या दिवसी लोक चळवळ निर्माण होईल त्या दिवसी प्रत्येकाला आत्मीक सुख लाभेल. त्यासाठी शिबिरार्थीनी परिश्रम घेणे अतिशय आवश्यक आहे. सेवा म्हणजे एखाद्या माणसाला त्याच्या जिवनात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तयार करणे होय, असे मत जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ त्यांनी व्यक्त केले.



फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने विशेष ग्रामीण शिबिराचे आयोजन ३ ते ९ एप्रिलपर्यंत दर्शनी माल येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन ४ एप्रिल रोजी पार पडले. याप्रसंगी ते उद्घाटकस्थानावरून बोलत होते. अध्यक्षस्थानी फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोलीचे प्राचार्य डॉ. एस. के. खंगार होते. प्रमुख अतिथी म्हणून मुख्य तपास अधिकारी सुशिल चांदेकर, प्रा. डॉ. विवेक गोर्लावार, प्रा. डॉ. रूपेन्द्रकुमार गौर, दर्शनी मालच्या सरपंच जयपाला दुधबावरे, तंमुस अध्यक्ष सुधाकर वैरागडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पोर्णिमा वैरागडे, सेवा सहकारी समिती अध्यक्ष शंकर उडाण, वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप भांडेकर, ग्रा.पं. सदस्य विनोद सातपूते, शोभा कोठारे, ज्योती उडाण आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. के. खंगार यांनी शिबिरार्थी आणि गावकरी यांच्या सहसंबंधातून गावातील समस्या सोडविल्या जावू शकतात. तसेच अंधश्रध्दा निर्मूलन व मतदान जागृती करण्याकरिता युवकांनी पुढाकार घ्यावा. कारण युवकच खऱ्या अर्थाने राष्ट्रविकासाचे आधार स्तंभ आहेत. त्याशिवाय राष्ट्र, समाज, खेडे यांचा विकास होवू शकत नाही. म्हणून श्रम, संस्कार आणि ग्रामीण या त्रिसूत्रीला नजरेसमोर ठेवून शिबिरार्थीनी कार्य करावे, असे आवाहन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांची समायोचीत मार्गदर्शन भाषणे झाली.

संचालन प्रा. वाय. आर. गहाणे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. दीपक तायडे तर आभार प्रा. हितेश चरडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शिबिरार्थ्यांनी सहकार्य केले.







उद्घाटनिय रात्रीचे चर्चासत्र व प्रार्थनेने दिवसाची समाप्ती








दिनांक 05 एप्रील 2022 प्रार्थना आणि योगा ने दिवसाची सुरवात

**शिबिरार्थी चे आरोग्य आणी सकारात्मक उर्जा निर्माण हाण्यासाठी  दररोज प्रार्थना आणि योग साधनेने शिबिराच्या दिवसाची सुरवात  करण्यात येत असे**




ग्राम स्वच्छता करतांना शिबीरार्थी







अंधश्रध्देविरुध्द जनजागृती व विविध प्रयोग सादर करतांना अंधश्रध्दा निर्मुलन समीती चमु







**दिनांक 5 एप्रील 2022 सांस्कृतीक कायक्रम सादर करतांना शिबीरार्थी**







**रात्रीचे चर्चासत्र व प्रार्थनेने दिवसाची समाप्ती**

दररोज शिबिरार्थींनी दिवसभारात केलेल्या कार्याचा आढावा रात्रीच्या चर्चा सत्रात घेण्यात येऊन दुसऱ्या दिवशीच्या कामाचे भोजन. पाणी, स्वच्छता , सांस्कृतीक व रिजर्व अशाप्रकारे सर् समीती निहाय वाटप करुन प्रार्थना  घऊन दिवसाची समाप्ती करण्यात येत असे.







**दिनांक 6 एप्रील 2022 प्रार्थना व योगाने दिवसाची सुरवात**





**दिनांक 6 एप्रील 2022 विविध महापुरुषांच्या वेशभुषेत शिबीरार्थी**



|  |  |
|---|---|
| **दिनांक 6 एप्रील  अंधश्रध्दा जनजागृतीपर पथनाटय सादरीकरण** | |

|  |  |
|---|---|
| **अंधश्रध्दा जनजागृतीपर पथनाटय सादरीकरण** | |

शिबिरार्थीद्वारे विविध महापुरुषाची वेशभुषा करुन त्यांचे कार्य व विचार नागरीकांपर्यत पोहचवण्यात आले तसेच लाकांमधली अंधश्रध्दा दुर करुन जादु टोना आणि भुतबाधा या विषयावर विविधांगी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचात सदस्य सचीव श्री.वाढणकर साहेब उपस्थीत होत. सोबतच ग्रामस्थ सुध्दा उपस्थीत होते.

बौध्दीक सत्रामध्ये मतदान आपला अधीकार या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले याप्रसंगी आपल्या मार्गदर्शनात प्रा.प्रज्ञा वनमाली यांनी आजच्या तरुन पिढीने मतदानाचे महत्व जाणले आणि एकजुट केली तर गावाचा काया पालट होऊ शकते पण त्यासाठीएकजुट होणे आवश्यक आहे. तसेच जागृत होऊन भ्रष्टाचारन करता पैसा नखाता योग्य उमेदवार निवडण्याची आवश्यकता आहे म्हणुन आपण न चुकता मतदान करणे आवश्यक आहे आणी सजग नागरीक म्हणुन आपण योग्य उमेदवाराच्या हाती सत्ता दिली तर गावाचा सर्वागीन विकास नक्कीच होईल असे मत व्यक्त केले .





**सांस्कृतीक कार्यक्रम सादर करतांना शिबिरार्थी**

**रात्रीचे चर्चासत्र आणि प्रार्थनेने दिवासाची समाप्ती**














दिनांक 07 एप्रील 2022 योग आणि प्रार्थनेने दिवसाची सुरवात

## श्रमदान व स्वच्छता करतांना शिबिरार्थी




## मतदान जनजागृतीपर पथनाट्य सादरीकरण










सामुदयीक विकासात युवकांची  भुमीका या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ.संदीप लांजेवार

प्रार्थनेने दिवासची समाप्ती




योगासनाने दिवसाची सुरवात



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त साकारण्यात आलेल्या चवदार तळे सत्याग्रहाची छायाचीत्रे

























नमन त्या पराक्रमाला
नमन त्या देशप्रेमाला
नमन त्या ज्ञानदेवतेला
नमन त्या महापुरुषांना
नमन अशा आपल्या
बाबासाहेबांना....!!

ज्ञानसूर्य महामानव , भारतरत्न ...... 🙏 💙 🙏 ........
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या
जयंती निमित्त विनम्र अभिवादन...!!
💙🌀🙏









## समारोपीय कार्यक्रम व प्रस्थान

उपरोक्त प्रमाणे सत्र 2021-22 मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजीत विषेश श्रम सवस्कांर व ग्रामीण पार पाडण्यात आले. यामध्ये विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन समाज प्रबोधन करण्यात आले त्याच सोबत विविध प्रत्यक्ष कृतीतुन गावाचा विकास कसा होईल यावर ग्रामस्थांच लक्ष वेधण्यात आले. प्रस्तुत ग्रामीण श्रमसंस्कार शिबिर अत्यंत आनंदमय वातावरणात पार पडले. शिबिरादरम्यान काणताही अनुचीत प्रकारघडला नाही तसेच कोणलाही कोणत्याही प्रकारची इजा किंवा दुखापत झली नाही . सगळयांच्या सहकार्याने प्रस्तुत विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबीर पार पडले.

करिता आपल्या माहीतीस्तव फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सत्र -2021-22 विषेश श्रमसंस्कार व ग्रामीण शिबीर अहवाल सविनय सादर करण्यात येत आहे.

शिबिर समन्वयक

प्रा.दिपक व्ही.तायडे

दिनांक :- 13 मे 2022.

ठिकाण :- गडचिरोली.